# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## राज्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्याबाबतचा शासन आदेश मागे घेण्याबाबत

**(१) १४३८६ (१०-०९-२०२०). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुदत संपलेल्या सुमारे १४ हजार ग्रामपंचायतींवर पालकमंत्र्यांच्या सल्लामसलतीने प्रशासक नेमण्याचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यासंबंधीचा शासन आदेश दिनांक १३ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास ग्रामविकास विभागाने काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशामुळे राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या नेमणुका ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून करण्यास वाव मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवडणूक आयोगाने प्रशासक नेमण्यास अनुमती दिलेली असली तरी कुठेही राजकीय कार्यकर्त्यांच्या नेमणुका करा असे म्हटलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पंचायत पातळीवरील लोकशाही संपुष्टात आणणारा हा आदेश मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हा परिषदेच्या कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२) २७३४६ (१५-०६-२०२१). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाने शेळया वाटपासह कृषी विभागाच्या शेती अवजारे वाटपात मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी महिलांच्या नावाखाली गैरव्यवहार होत असल्याचे श्रमिक मुक्ती संघटनेच्या वतीने दिनांक १७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास पंचायत समिती, मुरबाड येथे आंदोलन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास जिल्हा परिषद सेस फंडातील योजनाच्या लाभार्थी आदिवासी महिला बचत गटाऐवजी अन्य बचत गटाला रुपये साडेसात लाख देऊन हा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी चौकशी करुन दोषीवर कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-११-२०२१) :** (१) होय हे खरे आहे. (सदरचे आंदोलन हे दिनांक १५.०३.२०२१ रोजी करण्यात आले होते.)
(२) हे खरे नाही, कृषि विभागामार्फत बचतगटांना/ ग्रामसंघांना अनुदानाने औजारे बँक (Tool Bank) देणे ह्या योजनेचा लाभ सर्व वर्गवारीतील बचतगटांना देण्यात येतो.
(३) संबंधित बचत गटाचे अध्यक्ष व सचिव यांनी कृषि विभागाच्या औजारे बँक या योजनेचा लाभ घेतल्यानंतर सदस्यांचे अंतर्गत फेरबदल केल्याचे निदर्शनास आले.तद्नंतर मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी, जि.प.ठाणे यांनी दोषीवर कारवाईचे आश्वासन दिले होते.
(४) संबंधित बचतगटाचे अध्यक्ष,सचिव व इतर सदस्यांची अंतर्गत फेरबदल केल्या प्रकरणी त्या बचत गटास दिलेल्या अनुदानाची रक्कम वसूल करून संबंधित दोषीवर फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करून कारवाई करण्याचे आदेश गटविकास अधिकारी,पंचायत समिती मुरबाड यांना जा.क्र. ठाजिप/ कृषि-२/वशी/१६६ दि.१८.०६.२०२१ अन्वये देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कृषी पर्यटन केंद्र स्थापन करण्याबाबत

**(३) ३४५२७ (१२-०१-२०२२). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जागतिक कृषी पर्यटनाच्या अनुषंगाने राज्यात कृषी पर्यटनाशी संबंधित सर्व विभागाशी चर्चा करुन कृषी पर्यटन केंद्र स्थापन करण्याची प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत शासनाच्या पर्यटन संचालनालयाने किती कृषी पर्यटन केंद्रे स्थापन करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे, याबाबतची वस्तुस्थिती व स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**गिरीश महाजन (०८-०९-२०२३) :** (१) राज्याच्या कृषी पर्यटन धोरणास दि.२८/०९/२०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे
(२) कृषी धोरणातील तरतूदीनुसार पर्यटन संचालनालयामार्फत कृषी पर्यटन केंद्राची नोंदणी करण्यात येते. आतापर्यंत एकूण ५६३ कृषी पर्यटन केंद्राना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील सेवानिवृत्तधारकांचे निवृत्तीवेतन प्रलंबित असल्याबाबत

**(४) ३५०९३ (१२-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील सेवानिवृत्तधारकांना गत आठ महिन्यांपासून निवृत्तीवेतन मिळाले नसल्याचे माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू विभागातील सेवानिवृत्त पैकी अनेकांची वयाची ६५ वर्षे पूर्ण झालेली असून त्यांना वृध्दापकाळात आजारपण आणि जीवन जगण्याकरिता संघर्ष करावा लागत असून नियमित पेन्शन मिळत नसल्याने त्यांची उपासमार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) सदर सेवानिवृत्तधारकांना जानेवारी २०२२ पासून नियमित निवृत्तीवेतन मिळत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जत (जि.सांगली) तालुक्यातील गावांचा कायापालट तसेच नव्या व्यवसायांना संधी प्राप्त होण्याबाबत**

**(५) ३९८४० (०७-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुका चार राष्ट्रीय महामार्गाने जोडला गेला असल्याने मागील अनेक वर्षापासून दुष्काळ व बेरोजगारीने त्रासलेला असून या महामार्गामुळे विकासाच्या संधी येतील व काही प्रमाणात बेरोजगारी दूर होईल असे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग १ लक्षात घेता जत तालुक्यातील या महामार्गावरील कुंभारी, मुचंडी, डफळापूर, बिळूर गावांचा विकास तसेच नव्या व्यवसायांना संधी प्राप्त होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) जत तालुक्यातील महामार्गावरील कुंभारी, मुचंडी, डफळापूर, बिळूर या गावातील उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती, जत अंतर्गत कुंभारी-२७, समूह, मुचंडी-२१ समूह, डफळापूर-३७ समूह, बिळूर-५२ असे एकूण १३७ समूह (कुटुंबसंख्या-१२४४) स्थापन केलेले आहेत. त्यापैकी कुंभारी-१७ समूह, मुचंडी-२१ समूह, डफळापूर-१६ समूह, बिळूर-२४ समूह अशा एकूण ७८ समूहांना प्रति रु.१५,०००/- याप्रमाणे रु.११.७० लाख इतका फिरता निधी (Revolving Fund) तसेच डफळापूर व मुचंडी या गावांना एकूण रु.१२.६० लाख इतका समुदाय गुंतवणूक निधी (Community Investment Fund) देण्यात आलेला आहे.

प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेंतर्गत (PMFME) डफळापूर गावात दोन महिलांना ग्रामसंघामार्फत एकूण रु.८०,०००/- बीजभांडवल देण्यात आलेले आहे. तसेच कुंभारी-२१ समूह, मुचंडी-६ समूह, डफळापूर-१५ समूह व बिळूर-१६ समूह अशा एकूण ५८ समूहांना रक्कम रु.९५.८० लाख इतका कर्जपुरवठा बँकेमार्फत करणेत आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद अंतर्गत शासकीय युनानी दवाखान्यामध्ये कार्यरत असलेल्या युनानी हकीम वर्ग-३ व औषध निर्माता या संवर्गातील मंजूर असलेली रिक्त पदे भरण्याबाबत**

**(६) ४१३७० (०७-०४-२०२२). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद अंतर्गत शासकीय युनानी दवाखान्यामध्ये कार्यरत असलेल्या युनानी हकीम वर्ग-३ व औषध निर्माता या संवर्गातील मंजूर असलेली रिक्त पदे भरण्याबाबत शासनातर्फे कार्यवाही सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास जिल्हा परिषद अंतर्गत शासकीय युनानी दवाखान्यामध्ये कार्यरत असलेल्या युनानी हकीम वर्ग-३ व औषध निर्माता या संवर्गातील मंजूर असलेली रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ जानेवारी २०२१ रोजी मा.ग्रामविकास मंत्री तसेच मा.उपमुख्यमंत्री यांना दिनाक १ मार्च, २०२१ रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्याअंती काय आढळून आले, तदनुसार शासकीय युनानी दवाखान्यामधील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेच्या गट-क मधील पदभरती कार्यक्रमांतर्गत औषध निर्माण अधिकारी या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(२) होय.
(३) ग्रामविकास विभागांतर्गत युनानी हकीम (वर्ग-३) संवर्गात औरंगाबाद विभागात २६ पदे मंजूर असून त्यातील ६ पदे भरलेली असून २० पदे रिक्त आहेत. सदर २० पदे पुनरुज्जीवित करुन भरणेच्या अनुषंगाने प्रस्ताव मा.अ.मु.स.(सेवा), सा.प्र.वि. व मा.प्र.स. (व्यय), वित्त यांच्या उपसमितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. मा.अ.मु.स. (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने दि.१८.११.२०२१ च्या बैठकीत सुधारित आकृतीबंध अंतिम झाल्याशिवाय उपसमितीसमोर रिक्त पदभरतीचे प्रस्ताव सादर न करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, वित्त विभागाने ग्रामविकास विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजूर नसल्याने प्रस्तावधीन पदे १०० टक्के भरण्यास मंजूरी देणे उचित राहणार नाही, सुधारीत आकृतिबंधात सदर संवर्गात नेमकी किती पदे मंजूर होतील हे सध्या निश्चित नाही, सुधारीत आकृतीबंधात सदर संवर्गात पदे कमी झाल्यास अधिसंख्य पदे निर्माण करावी लागतील, ही बाब विचारात घेता विभागाने प्रथमत: सुधारीत आकृतीबंध अंतिम मंजूर करण्याची कार्यवाही पुर्ण करावी, असे अभिप्राय दिले आहेत. ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषद/ पंचायत समितीसाठी मंजूर असलेल्या पदांचा सुधारीत आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

## डोणगांव (जि. बुलढाणा) राज्य महामार्गावर असणा-या डोणगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरणेबाबत.

**(७) ४१४३२ (१२-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोणगांव (जि. बुलढाणा) येथील राज्य महामार्गावर असणा-या प्राथमिक आरोग्य केद्रातील आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोग शाळा तंत्रज्ञ, क्षय व हिवताप तंत्रज्ञ ही पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,
(२) तसेच, अमडापूर येथील प्राथमिक आरोग्य केद्रांतर्गत १७ पदे रिक्त आहेत ,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, ही रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रास आकृतीबंधानुसार १५ पदे मंजूर असून शासन निर्णय दि.१७.१.२०१३ अन्वये २ आरोग्य सेविका व १ वैद्यकीय अधिकारी यांचे अतिरिक्त पद मंजूर आहे. सदर एकूण मंजूर १८ पदांपैकी १३ पदे भरलेली असून ५ पदे रिक्त आहेत. रिक्त पदामध्ये आरोग्य सेविका व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांचा समावेश आहे.
(२) नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र, अमडापूर येथे आकृतीबंधानुसार १५ पदे व शासन निर्णय दि.१७.१.२०१३ नुसार आरोग्य सेविका चे १ अतिरिक्त पद असे एकूण १६ पदे मंजूर असून त्यापैकी १२ पदे भरलेली आहेत. एकूण ४ पदे रिक्त आहेत.
(३) (४) व (५) जिल्हा परिषदांकडील गट-क मधील १८ संवर्गातील रिक्त पदे ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी जिल्हा परिषदांमार्फत माहे मार्च, २०१९ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. ही पदे शासनाच्या महाआयटी मार्फत

परीक्षा घेऊन भरण्यात येणार होती. दरम्यान लोकसभा व विधानसभा निवडणूक आचारसंहिता तसेच, त्यानंतर महापोर्टल रद्द झाल्याने सदरची परिक्षा होऊ शकली नाही. कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर वित्त विभाग शासन निर्णय दि.४.५.२०२० अन्वये सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग वगळता अन्य विभागातील पदभरतीवर निर्बंध घालण्यात आले होते.

तद्नंतर या विभागाच्या अखत्यारितील जिल्हा परिषदेंतर्गत गट-क मधील आरोग्य व इतर संवर्गाच्या पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम विभागाच्या दि.२१.१०.२०२२ व दि.१५.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आला. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार परिक्षा टि.सी.एस./ आय.बी.पी.एस. या कंपन्याद्वारे ऑनलाईन पध्दतीने घ्यावयाच्या आहेत. त्यानुसार आय.बी.पी.एस. या कंपनीसोबत सामंजस्य करार (MOU) अंतिम करण्यात आला असून त्यानुषंगाने Application Portal विकसित करुन लवकरच जिल्हा परिषद स्तरावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहेत.

---

## शासनाच्या गट-अ सवंर्गामधील " गट विकास अधिकारी" या पदावरील अधिका-यांच्या पदोन्नतीत झालेल्या अनियमिततेबाबत

**(८) ४६०६९ (२५-०९-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या गट-अ संवर्गातील गट विकास अधिकारी (एस-२३) ५६०००-१७७५०० संवर्गातील अधिका-यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २००० मध्ये निवड झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदावर शासन सेवेत सन २००२ मध्ये नेमणूका देण्यात आल्या व सन १९९४ ते सन २००० व सन २००० ते २००२ कालावधीमध्ये म.वि.से. गट-ब च्या सरळसेवेच्या बिंदूवर वर्ग -३ मधून अनेक अधिका-यांना पदोन्नती देण्यात आल्यामुळे वरील अधिका-यांची सेवाज्येष्ठता डावलण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००८ मध्ये त्यांची म.वि.से. गट-अ मध्ये पदोन्नती झाली आहे परंतु त्यांना म.वि.से. गट-अ पदावर सन २०१३ मध्ये नियमित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधीतांना २००८ पासूनच गट अ मध्ये नियमित करणे अपेक्षित होते परंतु तसे न केल्यामुळे त्यांची सेवाज्येष्ठता २०१३ पासून गृहीत धरण्यात आली आहे, त्यामुळे संबंधीत अधिका-यांवर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय?

(५) असल्यास, सदरहू प्रकरणी संबंधी अधिका-यांच्या सेवाज्येष्ठतेबाबत योग्य ती चौकशी करून त्यांना न्याय देण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-०८-२०२३) :** (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २००० मध्ये निवड झालेले महाराष्ट्र विकास सेवा, गट -ब संवर्गातील अधिकारी सध्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( एस-२३) संवर्गामध्ये कार्यरत आहेत.

(२) महाराष्ट्र विकास सेवा, गट-ब संवर्गाची सन १९७९ पासून ते आजपर्यंतची सेवाज्येष्ठता यादी सुधारित करणेबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(३) होय

(४) महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ गट विकास अधिकारी संवर्गाची सुधारित सेवा ज्येष्ठतायादी तयार करण्यासंदर्भात विभागात कार्यवाही सुरू आहे.

(५) महाराष्ट्र विकास सेवा गट- अ व गट- ब संवर्गाची सुधारीत ज्येष्ठतायादी प्रकाशित करणेबाबत विभागामार्फत कार्यवाही सुरू आहे.

---

**चंद्रपूर जिल्हयातील मूल पंचायत समिती येथे मौजा चांदापूर येथे घरकुल योजनेमध्ये बनावट नावे दाखवून शासनाची व लाभधारकांची फसवणूक केल्याबाबत**

**(९) ४९५२३ (१९-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा चांदापूर (जि.चंद्रपूर) येथील सरपंच, सचिव, विस्तार अधिकारी व गटविकास अधिकारी यांनी मूल पंचायत समिती येथील घरकूल योजनेची 'ड' यादीमधील पात्र लाभधारकांना घरकुलांचा ताबा न देता लाभधारकांची बनावट नावे दाखवून शासनाची व लाभधारकांची फसवणूक केल्याचे दिनांक १४/७/२०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी पत्राद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर तसेच दिनांक २२/७/२०२२ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मूल यांना निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुषंगाने खऱ्या लाभार्थ्यांना घरकुलाचे वाटप करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली तसेच संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०४-०८-२०२३) :** (१) होय.

(२) या संदर्भात चौकशी करण्यात आली असून, चौकशीअंती कुठलीही अनियमितता आढळून आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे साबळेवाडी (ता. खेड, जि. पुणे) येथील श्री अंबिका देवस्थानाला 'क' वर्गाचा दर्जा देण्याबाबत**

**(१०) ४९६८७ (२०-०१-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साबळेवाडी (ता. खेड, जि. पुणे) येथे श्री अंबिका देवस्थान मंदिर पुरातन काळापासून अस्तित्वात असून ग्रामस्थ व लोकप्रितीनिधी यांनी वर्गणीद्वारे निधी जमा करुन देवस्थानाचा जीर्णोध्दार केला, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, नवरात्रोत्सव तसेच मार्गशीर्ष पोर्णिमा, चैत्र पोर्णिमा या उत्सवांना गर्दी होत असल्याने अल्प सुविधांमुळे देवस्थान ट्रस्टवर ताण पडत आहे तसेच भाविकांकडून मिळत असलेल्या देणग्यांतून विकास कामे करण्यास मर्यादा येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री अंबिका देवस्थान ट्रस्ट, साबळेवाडी (ता.खेड, जि.पुणे) यांनी मा.मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, पालकमंत्री यांच्याकडे दिनांक २७.१०.२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे शासनाने देवस्थानला 'क' वर्गाचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास,सदरहू मागणीच्या अनुषंगाने देवस्थानला 'क' वर्गाचा दर्जा देण्यासंदर्भांत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१), (२) व (३) होय, खरे आहे.

(४) जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून त्रुटींची पूर्तता करून श्री.अंबिका देवस्थानचा परिपूर्ण प्रस्ताव दि. २२ जून, २०२३ रोजी यासाठी सक्षम असलेल्या जिल्हा नियोजन समितीकडे "क" दर्जा देण्यासाठी सादर केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यात यशवंत घरकुल योजना आणि दिव्यांग घरकुल योजनांमधील मंजूर घरकुलांच्या बांधकामास झालेल्या विलंबाबाबत

**(११) ४९७२१ (२०-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या सन २०२२-२३ च्या ग्रामविकास निधीमधून राबविण्यात येणाऱ्या यशवंत घरकुल योजना आणि दिव्यांग घरकुल योजनेअंतर्गत मंजूर एक हजाराहून अधिक घरकुलांचे बांधकाम अतिशय संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरकुल योजनांमधील मंजूर बांधकामे, पूर्ण बांधकामे आणि अपूर्ण बांधकामे यांचा दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारापर्यंतचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मंजूर घरकुलांचे १०० टक्के बांधकाम पूर्ण होऊन ही घरकुले प्रत्यक्ष लाभार्थ्यांना वितरीत करण्यासाठी सुमारे किती कालावधी लागेल,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्‌अनुषंगाने उक्त योजनेस होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-०८-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर योजना ही पुणे जिल्हा परिषदेच्या निधीमधून राबविण्यात येणारी नवीन योजना आहे. सदर योजना नवीन असल्याने तांत्रिक अडचणीमुळे निधी वितरीत करण्यास विलंब झाला होता. आता तांत्रिक अडचणीचे निराकरण झाले असून बांधकाम सुरु झाले आहे.

(२) दि. १० नोव्हेंबर, २०२२ पर्यंत यशवंत घरकुल योजना व दिव्यांग घरकुल योजनेअंतर्गत अनुक्रमे ४५९ व १३१ घरकुले मंजूर असून सदर घरकुलांचे बांधकाम प्रगती पथावर आहे.

(३) सदर योजना प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या धर्तीवर राबविण्यात येत असून, घरकुलाचे बांधकाम लाभार्थ्यांनीच पूर्ण करावयाचे आहे. लाभार्थ्यांनी केलेल्या बांधकामाच्या प्रमाणात ४ टप्प्यात निधी वितरित केला जातो.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुंबेफळ ( ता. अंबाजोगाई, जि.बीड ) येथील ग्रामपंचायतीच्या प्रभाग निहाय आरक्षणाबाबत

**(१२) ५११८५ (२५-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंबेफळ (ता.अंबाजोगाई जि.बीड) येथे तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनी प्रसिद्ध केलेल्या यादीत ओबीसी मतदारांची संख्या ४८६ असल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात सदर गावात ओबीसी मतदारांची संख्या मतदार यादीत ८५० असतानाही कुंबेफळ येथे शुन्य दाखविल्याचे निदर्शनास आहे , हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चुकीच्या माहितीवरून केलेली ग्रां.प. वार्ड निहाय आरक्षण रद्द करून ओबीसी समाजाची संख्या तपासून ओबीसी डाटा परत तयार करून आरक्षण देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.राज्य निवडणूक आयोगाकडे केली होती हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य निवडणूक आयोगाने नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाचा आरक्षणाचा अहवाल समर्पित आयोगाने तयार करून शासनास सादर केला असून निवडणुक आयोगाला, सदर अहवालात दिलेल्या आकडेवारीत बदल करण्याचे कोणतेही अधिकार नसल्याने सदर प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी उप सचिव, ग्रामविकास विभाग, मुंबई. यांच्याकडे पाठवले आहे. हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची चुकीच्या माहितीवरून केलेली ग्रां.प. वार्ड निहाय आरक्षण रद्द करून ओबीसी समाजाची संख्या तपासून ओबीसी डाटा परत तयार करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ग्रामविकास मंत्री व सचिव, ग्रामविकास विभाग, मुंबई यांच्याकडे दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अशंत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) होय, हे खरे आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेचे अनुदान लाभार्थ्यांना मिळाले नसल्याबाबत

**(१३) ५१२८१ (२१-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत जिल्हयात सुमारे ६० हजार घरे बांधण्यात आली असून त्यासाठी अंदाजे ७२० कोटी रुपये इतके खर्च करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच अजूनही प्रपत्र "ब" मधील १०३३ आणि प्रपत्र "ड" मधील १७४५ अशा एकूण २७७७ लाभार्थ्यांना शासनाचे अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त लाभार्थ्यांना अनुदान त्वरीत अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०४-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम त्यांनी केलेल्या बांधकामाच्या टप्प्यानुसार त्यांच्या खात्यावर थेट जमा होते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामपंचायत बोईसर (ता.जि. पालघर) हद्दीत चंद्रकांत भिकाजी भोणे यांनी बेकायदेशीर रित्या इमारत बांधकाम करून रेस्टॉरंट बार परवाना घेतल्याबाबत

**(१४) ५१२९० (२१-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत बोईसर (ता.जि. पालघर) हद्दीत चंद्रकांत भिकाजी भोणे यांनी बेकायदेशीर रित्या इमारत बांधकाम करून रेस्टॉरंट बार परवाना घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी इमारतीचे बांधकाम चालू असताना पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे काय,
(३) तसेच, ग्रामसेवकांनी बेकायदा ना - हरकत दाखला दिला आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

## भिवंडीत दारिद्रयरेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण होत नसल्याने पात्र कुटुंबे योजनांपासून वंचित असलेबाबत

**(१५) ५१३६६ (१८-०१-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.राहूल कुल (दौंड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: पुणे जिल्ह्यात व भिवंडी महापालिकाक्षेत्रातील गरीब व दारिद्रयरेषेखालील कुटुंबीयांचे सुमारे १७ वर्षापासून सर्वेक्षण झाले नसल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे पुणे जिल्हयात नव्याने स्थायिक झालेल्या दारिद्रयरेषेखालील नागरीकांची अचूक माहिती प्रशासनाकडे उपलब्ध नाही तसेच सदर लाभार्थी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांच्या सुविधांपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात दारिद्रयरेषेखालील नागरीकांचे नव्याने सर्वेक्षण करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्यात दारिद्रय रेषेखालील कुटुंबगणना - २००२ करण्यात आली. सदरील दारिद्रयेरेषेखालील कुटुंबगणना ही केंद्र शासनाच्या निर्देशानुसार १३ सामाजिक व आर्थिक निकषाच्या आधारे Score based Ranking नुसार करण्यात आलेली आहे.

दरम्यान १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या अनुषंगाने केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या सूचनेनुसार राज्यात सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण कार्यक्रम २०११ ( SECC - २०११) राबविण्यात आला. सर्वेक्षणाच्या अनुषंगाने सर्व जिल्ह्यातील अंतिम याद्या मार्च, २०१६ अखेर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. सदर डेटा चा वापर केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थी निवडीकरिता करण्यास सुरुवात झाली आहे.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेअंतर्गत सन २००५ मध्ये झालेल्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांच्या सर्वेक्षणानुसार ७६८७ इतकी दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांची संख्या निश्चित केली होती. यानुसार सन २०१४ पर्यंत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचा लाभ व तद्नंतर मार्च, २०१७ पर्यंत दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाचा लाभ देण्यात येत होता. सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण मध्ये दारिद्रय ठरविण्याकरिता लाभार्थीची संज्ञा व्यापक करण्यात आली. त्यानुसार ८९,६०० लाभार्थी भिवंडी निजामपूर महानगरपालिका क्षेत्रात असून सद्य:स्थितीत त्यांना दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

दारिद्रय रेषेखालील कुटुंबगणना-२००२ नुसार पुणे जिल्ह्यामध्ये दारिद्रय रेषेखालील एकूण १,२२,१३२ इतकी संख्या निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार सदर कुटुंबातील लाभार्थ्यांना इंदिरा आवास योजना / प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण इ. योजनांचा लाभ देण्यात आला. तद्नंतर सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ यादी मध्ये पुणे जिल्ह्यात एकूण ४५,९३३ ग्रामीण भागातील कुटुंबांचा समावेश असून ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दि. १६.०२.२०१८ नुसार प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत योजनांचा लाभ देणेत येत आहे.

दारिद्रय रेषेखालील कुटुंबगणना - २००२ व सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण २०११ कार्यक्रम (SECC-२०११) हे दोन्ही सर्वेक्षण केंद्र शासनामार्फत करण्यात आले असून सध्या दोन्ही सर्वेक्षण पूर्ण झालेली आहेत. सदर याद्यांमध्ये बदल करणे, याबाबत केंद्र शासनाकडून सध्या सूचना प्राप्त नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन लागू करणेबाबत

**(१६) ५१७३७ (२०-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा व कामगार विभागाने १० ऑगस्ट २०२० रोजी राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन लागू करून त्यानुसार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकाऱ्यांना याबाबत लेखी परिपत्रकाद्वारे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणास २४ महिने होवूनही जिल्ह्यातील असंख्य ग्रामपंचायत कर्मचारी हक्काच्या वेतनापासून वंचित राहिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यामध्ये काय आढळून आले, अनुषंगाने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन लागू करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

उद्योग उर्जा व कामगार विभागाने दि.१०.०८.२०२० रोजीच्या अधिसूचनेन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन दर सुधारीत केले आहे. तथापी, उद्योग उर्जा व कामगार विभागामार्फत किंवा या विभागामार्फत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना याबाबत कोणत्याही लेखी परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या नाहीत.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामीण भागात घरकुल लाभाची रक्कम ३ लक्ष करणेबाबत

**(१७) ५२१५० (२०-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सद्यस्थितीतील वाढती महागाई घर बांधण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या सर्व वस्तुंचे भाव दुपटीने वाढल्याने ग्रामीण भागात विविध योजनेतून सुरू असलेल्या घरकुल लाभाची रुपये १.४२ लक्ष रक्कम कमी असून ही रक्कम वाढवून किमान ३ लक्ष करण्याबाबतची मागणी ग्रामीण भागातील घरकुल पात्र लाभार्थीकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे, ही खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागात विविध योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या घरकुल लाभाची रक्कम वाढवण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०४-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गतलाभार्थ्यांच्या अनुज्ञेय अनुदानात रु.२.५० लक्ष वाढ करण्याबाबत ग्रामीण विकास मंत्रालय,भारत सरकार यांच्याकडे दिनांक २५.११.२०२०रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असता केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ०२.१२.२०२० च्या पत्रान्वये अशी कुठलीही वाढ करता येत नाही, असे कळविले आहे. तद्नंतरही दि.०१.०८.२०२२ रोजी पुन्हा केंद्र शासनाकडे अनुदान वाढीची मागणी केली आहे. यासंदर्भात केंद्र शासनाकडून अद्याप प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील गटविकास अधिकारी आणि ग्रामसेवक हे नियमानुसार काम करीत नसल्याबाबत

**(१८) ५२३१६ (१९-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील गटविकास अधिकारी आणि ग्रामसेवक हे शासनाच्या ध्येय धोरण व नियमानुसार काम करीत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील गटविकास अधिकारी, ग्रामसेवक हे मुख्यालयी राहत नसून दोन्ही अधिकारी बहुतांश महिन्यातून एक किंवा दोन वेळेस नेमून दिलेल्या गावांमध्ये जात असल्याने ग्रामस्थांची कामे होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक ग्रामसेवक एकाच तालुक्यामध्ये पाच ते सहा वर्षापेक्षा जास्त काळ सेवेत असून तालुक्यांतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे करण्यात येत नसल्याने तालुक्यातील विकास कामांवर त्याचा विपरित परिणाम होत असल्याने ग्रामस्थांन मध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(४) तसेच नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्याचे गटविकास अधिकारी व धर्माबाद तालुक्याचे गटविकास अधिकारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (नायगाव) यांनी दि.२२.१०.२०२२ व २९.१०.२०२२ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नांदेड यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. जिपब ४१४/प्र.क्र.११२/आस्था १४, दिनांक १५.०५.२०१४ अन्वये जिल्हा अंतर्गत बदल्यांची अंमलबजावणी धोरणानुसार संबंधित ग्रामसेवकांच्या बदल्या केल्या जातात.

(४) होय, हे खरे आहे.

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी दि.०२.११.२०२२ रोजीच्या पत्रानुसार श्री.आर.एस.बजाज, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरी व श्री. एम.डी.जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धर्माबाद यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धर्माबाद दि.१४.११.२०२२ अन्वये खुलासा सादर केला आहे. सदर खुलाश्यात त्यांनी मुख्यालयी राहत असल्याचे नमूद करून त्यांचा अपघात झाल्यामुळे जवळपास दोन महिने रजेवर होते.

ते आजारी असल्यामुळे दिनांक ०१.११.२०२२ रोजी वैद्यकीय कारणावरून दि.२८.०२.२०२३ पासून स्वेच्छासेवानिवृत्ती घेतली आहे.

श्री. एम.डी. जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरी यांनी पत्र दि.११.११.२०२२ अन्वये खुलासा सादर केला असून सदर खुलाश्यात त्यांनी दिनांक २२.१०.२०२२ ते दिनांक २४.१०.२०२२ उक्त कालावधीत दिवाळीची सार्वजनिक सुट्टी असल्याचे नमूद करून मूळ गांव किनवट तालुक्यातील मलकापूर (खेर्डा) येथील अतिदुर्गम डोंगराळ भाग असल्यामुळे भ्रमणध्वनीस रेंज येत नसल्याने मा. आमदार महोदय यांचेशी संपर्क होऊ शकला नसल्याचे खुलाश्यात नमूद करून त्यांनी त्याच दिवशी म्हणजे दि.२२.१०.२०२२ रोजी आमदार महोदय यांची नांदेड येथील निवासस्थानी ठीक ६.१५ वाजता प्रत्यक्ष भेट घेतल्याचे नमूद केले आहे.

(५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी त्यांच्या दि.१७.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपर मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांना श्री. एम. डी. जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरी यांची नांदेड यांची जिल्हयाबाहेर बदली करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.तसेच या विभागाच्या मविसे१०२२/ प्र.क्र.२७३/२०२२/आस्था-३, दि.२८.०२.२०२३ आदेशानुसार श्री.आर.एस.बजाज यांची स्वेच्छासेवानिवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

---

**मुखेड (जि.नांदेड) शहरातील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या बाजूस अतिक्रमण करुन दुकाने बांधलेअसल्याबाबत**

**(१९) ५३०९३ (२१-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) शहरातील जिल्हा परिषदेच्या मुलींच्या व मुलांच्या दोन्ही शाळांच्या रिकाम्या जागेत बडया व्यापाऱ्यांनी अतिक्रमण करुन दुकाने बांधल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी प्रशासनाकडून गाळे बांधकाम करुन दिल्यास जवळपास ५०० ते १००० दुकानांचे बांधकाम होऊ शकेल व सदर दुकानातून शासनाला मोठा महसूल मिळू शकतो हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकरणी चौकशी करण्यात आली काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार स्थानिक प्रशासनाकडून दुकाने बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणाबाबत चौकशी करुन अतिक्रमण धारकाविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आलेली आहे.

(४) सदर प्रकरण मा. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, मुखेड व मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे न्यायप्रविष्ट आहे.

---

**जळगाव जिल्हयात घरकुल योजनेच्या अंमलबजावणीत होत असलेले दुर्लक्ष**

**(२०) ५३९२३ (२०-०१-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव, जिल्हा घरकुल योजनेच्या अंमलबजावणीत प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने येथील पंचायत समितींकडून लाभार्थ्यांना घरकुलाची रक्कम वेळेत अदा झाले नसल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू लाभार्थ्यांना कार्यालयास वारंवार जावे लागत असल्याने त्यांच्यामध्ये असंतोषाची भावना निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त घरकुल योजनेच्या अंमलबजावणीस गती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०४-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण अभियंता टप्पानिहाय घराची तपासणी करुन ऑनलाईन पध्दतीने कार्यवाही केली जाते व लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम त्यांनी केलेल्या बांधकामाच्या टप्प्यानुसार त्यांच्या खात्यावर थेट जमा होते.
(३) राज्यात ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनामध्ये लोकाभिमुखता, पारदर्शकता आणून या योजना गतिमान करण्यासाठी व गुणवत्ता वाढीसाठी राज्यात महाआवास अभियान राबविण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रधानमंत्री आवास योजनेपासून अनेक लाभार्थी वंचित राहत असल्याबाबत**

**(२१) ५४१२२ (२१-०१-२०२३). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील शिंदखेडा तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत निवड करण्यात आलेल्या "ड" यादीत विविध गावातील शेकडो लाभार्थी वंचित राहिले असून त्याचे नविन सर्वेक्षण करणेबाबत सातत्याने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिंदखेडा येथे तक्रारी प्राप्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी गटविकास अधिकारी, शिंदखेडा यांनी शासनाला तसा अहवाल सादर केला आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने वंचित लाभार्थींना प्रधानमंत्री आवास योजनेत सामावून घेणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०४-०८-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत "प्रपत्र ड" मधील तांत्रिक कारणाने अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांपैकी पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी पुन्हा करण्याकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनाकडे दि.१८/०५/२०२१ च्या पत्रांन्वये पाठविण्यात आला असता, केंद्र शासनाने दि.२०/०५/२०२१ च्या पत्रान्वये सदरचा प्रस्ताव अमान्य केला असून या संदर्भात पात्र लाभार्थ्यांना राज्य योजनेतून लाभ देण्याच्या सुचना केल्या आहेत.

तद्नंतर मा.लोकप्रतिनिधी कडून प्राप्त पत्राच्या अनुषंगाने लिंक उपलब्ध करुन देण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनास दि.१४.०१.२०२२ च्या पत्रान्वये पुन्हा पाठविण्यात आला आहे. अद्यापपर्यंत कोणत्याही सूचना केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून प्राप्त नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आरोग्य सेवकांची (एमपीडब्ल्यू) जिल्हा परिषद व हिवताप विभागातील पदे रिक्त असल्याबाबत

**(२२) ५४१५४ (२१-०१-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य सेवकांची (एमपीडब्ल्यू) जिल्हा परिषद व हिवताप विभागातील एकूण १५९९५ पदांपैकी ८११२ पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषदकडील आरोग्य सेविकांच्या (एएनएम) एकूण १७२०० पदांपैकी ८४१२ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील (एमपीडब्ल्यू)ची २५५ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडील आरोग्य सेवकांची (एमपीडब्ल्यू) मंजूर पदे ४३६ असून, २८७ पदे भरलेली आहेत व १४९ पदे रिक्त आहे.

(४) जिल्हा परिषद अंतर्गत गट-क संवर्गातील आरोग्य विभागाशी संबंधित व इतर संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता ग्रामविकास विभागाच्या दि.२१ ऑक्टोबर, २०२२ व दि.१५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्यात येत आहे. दि.९.५.२०२३ व दि.१५.५.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सरळसेवा पदभरती करीता असलेल्या गट-क च्या संवर्गांकरीता सुधारीत प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व अभ्यासक्रम निर्गमित करण्यात आला आहे. तसेच दि.१५.५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये भरती प्रक्रिया राबवितांना सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकसूत्रता असावी याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. ग्रामविकास विभागामार्फत भरती प्रक्रियेवर सनियंत्रण केले जात आहे. यासंदर्भात मा.प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचे अध्यक्षतेखाली क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व आय.बी.पी.एस. कंपनीचे अधिकारी यांचेसमवेत व्ही.सी.व्दारे आढावा घेण्यात येत आहे. जिल्हा परिषदेंतर्गत भरती योग्य रिक्त पदांच्या जाहिरातीचे प्रारुप अंतिम करण्यात आले असुन जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी आवश्यक कार्यवाही अंतिम टप्प्यात असून जुलै, २०२३ अखेर पर्यंत जाहिरात प्रसिद्ध करणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे जाधववस्ती (ता. मोहोळ, जि. सोलापूर) येथील नदीवर पूल बांधण्याबाबत

**(२३) ५४७७३ (१८-०१-२०२३). श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोगावती व नागझरी (ता. मोहोळ, जि. सोलापूर) या दोन नद्यांचा संगमाजवळ वाळूज गावाच्या पुर्वेला नदीच्या पलिकडे २०० लोकसंख्या असलेली जाधव वस्ती आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यात जाधववाडी गावाचा संपर्क तुटत असल्यामुळे या ठिकाणी पुल बांधण्याची मागणी वेळोवेळी शासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने या नदीवर पूल बांधण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ नुसार रा.मा.२०४ ते कळमण वाळूज मानेगाव हा रस्ता इतर जिल्हा मार्ग

क्र.२९ असून वाळूज गावाजवळ सा.क्र.०/३०० ते ०/३९० मध्ये भोगावती नदीवर पूल बांधण्याची मागणी करण्यात आली आहे.

सदर पूलाकरीता रु.१० कोटी निधीची आवश्यकता असून सदरचा पूल मोठ्या स्वरुपाचा आहे. जिल्हा परिषदेमार्फत मोठ्या स्वरुपाचे पूल बांधले जात नसल्यामुळे सदर पूलाचे बांधकाम नाबार्ड योजनेंतर्गत बांधणे आवश्यक आहे. यास्तव सदर पूलाचे बांधकाम नाबार्ड अंतर्गत प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेमार्फत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर यांना विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीक्षेत्र पद्मालय गणपती मंदिर, श्रीक्षेत्र सुकेश्वर महादेव मंदिर रवंजे, (ता.एरंडोल) तसेच श्रीक्षेत्र नागेश्वर महादेव मंदिर उंदीरखेडे, श्रीक्षेत्र देवगांव (ता. पारोळा) हया तीर्थक्षेत्रांचा '' ब'' वर्ग तिर्थक्षेत्रामध्ये समावेश करणेबाबत**

**(२४) ५५५५८ (२१-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीक्षेत्र पद्मालय गणपती मंदिर, श्रीक्षेत्र सुकेश्वर महादेव मंदिर रवंजे, (ता.एरंडोल) तसेच श्रीक्षेत्र नागेश्वर महादेव मंदिर उंदीरखेडे, श्रीक्षेत्र देवगांव (ता.पारोळा) हया तीर्थक्षेत्रांचा "ब" वर्ग तिर्थक्षेत्रामध्ये समावेश करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०९.११.२०२० रोजीच्या सुमारास मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांना लेखी निवेदनानुसार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) होय, खरे आहे.

(२) श्रीक्षेत्र पद्मालय गणपती मंदिर या तीर्थक्षेत्रास दि.२३/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये "ब" वर्ग दर्जा प्रदान करण्यात आला आहे. तसेच उर्वरीत तीर्थक्षेत्रांबाबत जिल्हा परीषद, जळगाव यांचा प्रस्ताव शासनास प्राप्त नाही. शासनाने दि.१५/०५/२०२३ रोजीचा पत्राद्वारे जिल्हाधिकारी, जळगाव व जिल्हा परीषद, जळगाव यांना श्रीक्षेत्र सुकेश्वर महादेव मंदिर रवंजे, (ता.एरंडोल), श्रीक्षेत्र नागेश्वर महादेव मंदिर उंदीरखेडे व श्रीक्षेत्र देवगांव (ता. पारोळा) या तीर्थक्षेत्रांचा "ब" वर्ग दर्जा देण्यासाठीचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रिक्षाचालक व मालक यांनी कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यास मागणी केल्याबाबत**

**(२५) ५६५९० (२४-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ मराठवाडा येथील शहर व जिल्ह्यातील रिक्षाचालक व मालक यांनी कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत परिवहन आयुक्तांकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेन्शन, उपदान, भविष्य निर्वाह निधी, दहा लाख सुरक्षा कवच असलेली आरोग्य विमा योजना तसेच अपघात विमा योजना अशा विविध मागण्या ही त्यांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदनुसार उक्त मागण्या पूर्ण करण्याबाबत तसेच कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच त्याची स्थापना कधीपर्यंत करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०३-०८-२०२३) :** (१) होय खरे आहे.

(२) होय खरे आहे.

(३) असंघटित क्षेत्रातील कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी मंडळे स्थापन करण्याबाबत लोकप्रतिनिधी तसेच विविध संघटनांमार्फत सातत्याने मागणी होत असल्याने राज्यातील विविध उद्योग क्षेत्रातील असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी दि. ०६/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये "असंघटित कामगार कल्याण महामंडळ" व व्यवसाय/उद्योगक्षेत्र निहाय ३९ आभासी मंडळे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

विविध उद्योग क्षेत्रातील असंघटित क्षेत्रातील व्यवसायानुसार दि. ०६/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्ट १ नुसार असंघटित कामगारांचे वर्गीकरण करण्यात आले असुन, परिशिष्ट १ मधील अनुक्रमांक ५ मध्ये ऑटो-रिक्षा व टॅक्सी तसेच प्रवासी तथा व्यावसायीक वाहन चालक, क्लीनर या कामगारांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उध्दवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या**
**कर्मचारी आणि महिलांच्या विविध मागण्यांबाबत**

**(२६) ५७४०९ (२४-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत उमेद राज्य महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटनेअंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचारी आणि महिलांच्या विविध मागण्या शासन दरबारी गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमेद मधील कर्मचारी आणि महिलांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू मागण्यांसदर्भात शासनाने आतापर्यंत काय निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) उमेद अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना पूर्वी प्रमाणे ५ टक्के वार्षिक वेतनवाढ लागू करणे, जिल्हास्तरावरील सहाय्यक कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनवाढ लागू करणे, जिल्हास्तरावरील सहाय्यक कर्मचाऱ्यांना किमान वेतनानुसार एकत्रित ठोक स्वरूपात मानधन लागू करणे, ५०% मानधन वाढ लागू करणे अशाप्रकारचे उमेद मधील कर्मचारी आणि महिलांच्या मागण्यांचे स्वरुप आहे.

(३) उमेद अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांना पूर्वीप्रमाणे माहे एप्रिल, २०२२ पासून एकूण वेतनाच्या (Cost to Company च्या) ५% वेतनवाढ, जिल्हास्तरावर कार्यरत सहाय्यक कर्मचा-यांना सुधारीत वेतनवाढ, राज्य व जिल्हास्तरावर कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला असल्यास अशा कर्मचाऱ्यांना एकुण मानधनाच्या अतिरिक्त ५ टक्के विशेष भत्ता लागू करणेबाबत तसेच जिल्हास्तरावरील सहाय्यक कर्मचा-यांना (लेखापाल, डेटा एन्ट्री ऑपरेटर, शिपाई) किमान वेतन कायद्यानुसार त्यांच्या परिमंडळानुसार वेतन लागू करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियांन यांचे अनुक्रमे दिनांक ०४.०४.२०२२, ११.१०.२०२२, ०१.०२.२०२३ व १३.०२.२०२३ रोजीचे कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मालकीची जागा विकसित करणेबाबत**

**(२७) ५८०९९ (२७-०४-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मालकीची जागा विकसित करणेबाबत शासनाकडे दिनांक १८.११.२०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागा विकसित करण्यासाठी जिल्हा परिषदेकडे निधी उपलब्ध नसल्याने सदरहू मोक्याच्या ठिकाणच्या अनेक जागा वापरा विनापडून आहेत याबाबत धोरण निश्चित करण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याबाबत मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक ठिकाणी स्थानिकांकडून अतिक्रमणे केली जात आहेत. या जागा विकसित केल्यास जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या उत्पन्नामध्ये मोठी भर पडू शकते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तदनुसार मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, जिल्हा परिषद अंतर्गत सर्व जागा व अतिक्रमण बाबत माहिती संकलित करण्यात येत आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या जागा विकसित केल्यास उत्पन्नामध्ये भर पडू शकते.

(४) जिल्हा परिषद अंतर्गत सर्व जागा व अतिक्रमण बाबत माहिती संकलित करण्यात येत आहे. लवकरच माहिती संकलित करुन अतिक्रमण झाले असल्यास अतिक्रमणाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत**

**(२८) ५८१५१ (२६-०४-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर व नांदूरा तालुका (जिल्हा बुलढाणा) येथील अनेक गावांमध्ये रस्त्यांना खडडे पडून रस्त्यांची दुरावस्था झाली असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे पाठपुरावा करुन माहे ३१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास मूलभूत सुविधा २५१५ अंतर्गत ग्रामीण भागातील विकासाकरिता शासननिर्णय काढून कामे मंजूर करून घेतली परंतू राज्य शासनाने ३१ जून,२०२२ रोजी मूलभूत सुविधे अंतर्गत मंजूर असलेल्या रस्त्यांच्या कामांना स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगोन उक्त ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामाची स्थगिती उठवण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) लेखाशिर्ष २५१५ १२३८ (मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणे) या योजनेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील रक्कम रु. २२.५० कोटी इतक्या कामांची स्थगिती उठविण्यात आली आहे.

याप्रकरणी विभागास जसे प्रस्ताव प्राप्त होत आहेत त्यानुसार शासन मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील जिल्हा परिषदेत छपाई बंद होत असल्याबाबत.**

**(२९) ५८३५५ (०२-०५-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेत होणारी छपाई बंद होत असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने जिल्हा परिषदेमध्ये होणारी छपाई बंद होण्यामागची कारणे काय आहेत, तसेच उक्त छपाई बंद न होण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे
(२) होय. या प्रकरणी चौकशी अंती जिल्हा परिषदेच्या मुद्रणांलयातील मशीनरी जुनी असल्याने व त्याचे साहित्य बाजारात उपलब्ध होत नसल्याने तसेच मुद्रणालयाबाबतचे नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत असल्याने या मुद्रणालयातुन छपाई करणे जिल्हा परिषदेला आर्थिकदृष्टया परवडत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच या मुद्रणालयातील एकमेव कार्यरत कर्मचारी नोव्हेंबर, २०२४ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असुन मुद्रणालयासाठी प्रशिक्षीत कामगार उपलब्ध होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही

---

**संत गाडगेबाबा यांचे जन्मस्थळ शेडगाव (ता. अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती)**
**येथील विकास आराखडयास निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(३०) ५८४९३ (०२-०५-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत गाडगेबाबा यांचे जन्मस्थळ असलेल्या शेडगाव (ता. अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयास दिनांक १४ फेब्रुवारी २०१९ च्या शासन निर्णयानुसार रुपये १८.६३ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सदर विकास आराखडयाचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात सदर आराखडयातील विकास कामासाठी रुपये ३.५० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून तद्नंतर वारंवार निधी मागणी केली असता अद्यापही निधी उपलब्ध करून दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२० पासून सदर आराखडयाचे काम सुरू असून अद्यापही निधीअभावी काम पूर्ण न झाल्याने या उक्त भागातील नागरिकांमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त विकास आराखडयास त्वरीत निधी करून देणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही. सदर आराखड्यास मंजूर रक्कम रु.१८.६३ कोटी पैकी आतापर्यंत रु.११.१८ कोटी इतका निधी वितरीत केला आहे.
(२) (३) व (४) ग्रामविकास विभागाच्या दि.३१/०७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार पहिल्या टप्प्यात रु.३.७३ कोटी इतका निधी वितरीत केला आहे. तसेच दि.१/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दुस-या टप्प्यात रु.७.४५ कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, अमरावती यांना वितरीत करण्यात आला असून सदर निधी खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. उर्वरित निधी वितरीत करण्यास प्रस्ताव कार्यवाहीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील मैल कामगार यांचा सातवा वेतन आयोग हप्ता प्रलंबित असल्याबाबत

**(३१) ५८९५१ (०९-०५-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील मैल कामगार यांच्या सातवा वेतन आयोग हप्ता व दिवाळी अग्रिम-२०२२ साठी लेखाशीर्ष ३०५४ -२४१९ -३६ अंतर्गत निधीची मागणी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद. बांधकाम विभाग क्र.२, बीड. यांनी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.१, बीड. यांचेकडे दिनांक ०४/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा निधी अद्यापही उपलब्ध करून देण्यात आला नसल्याने उक्त निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी संबंधित कर्मचाऱ्यानी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरहू निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शासन पत्र दि.३.३.२०२३ च्या आदेशानुसार आवश्यक निधी सा.बां.वि. क्र.२ यांना वितरीत करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद अमरावती येथील योजना पंचवीस पंधरा (२५-१५) योजनेअंतर्गत खालील गावांमध्ये लोकाभिमुख मूलभूत सुविधांची कामे मंजूर करण्याबाबत

**(३२) ५९०६१ (०३-०५-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद अमरावती पंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांनी त्यांचे दिनांक १४/११/२०२२ रोजी वा त्यासुमारासचे पत्र क्रमांक ३४९५ चे उपसचिव ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन बांधकाम भवन फोर्ट, मुंबई त्यांना पत्र लिहून योजना पंचवीस पंधरा (२५-१५) योजनेअंतर्गत खालील गावांमध्ये लोकाभिमुख मुलभूत सुविधांची कामे मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांच्या शिफारशींचे पत्र पाठविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्यामध्ये सासन रामापूर तालुका दर्यापूर येथे “क” वर्ग तीर्थक्षेत्र भोगेश्वर संस्थान या परिसरामध्ये रस्ता कॉंक्रिटीकरण पेवर ब्लॉक बसविणे रुपये २० लक्ष, टाकरखेडा कावरे तालुका दर्यापूर येथे खुल्या जागेवर हनुमान मंदिर

परिसरात सभामंडप बांधकाम करणे रुपये दहा लक्ष टाकरखेडा तावरे तालुका दर्यापूर येथे खुल्या जागेवर हनुमान मंदिराचे बांधकाम व परिसरात सुविधा निर्माण करणे रुपये १० लक्ष सासन रामपुर तालुका येथे गावांतर्गत रस्ता बांधकाम करणे वीस लक्ष रुपये आधी कामे समाविष्ट असल्याचा प्रस्ताव शासनाच्या उक्त विभागाला प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, शासनाचे याबाबतचे धोरण काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) लेखाशिर्ष २५१९५ १२३८ अंतर्गत मा. लोकप्रतिनिधी यांना शासन निर्णय क्र. विकास-२०२२/प्र.क्र. २१७/योजना-६, दि. ०४.११.२०२२ अन्वये रु. ५००.०० लक्ष इतक्या कामांस मंजूरी देण्यात आली असून प्रश्नात नमूद गावांतील इतर विकास कामांचा वरील शासन निर्णयात समावेश आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्राथमिक आरोग्य केंद्र, बुलढाणा जिल्हा परिषद येथील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या रजा रोखीकरणाचे व वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या देयकाबाबत

**(३३) ५९१७२ (२७-०४-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्राथमिक आरोग्य केंद्र, बुलढाणा जिल्हा परिषद येथील सेवानिवृत्त १११ कर्मचाऱ्यांचे रजा रोखीकरणाचे व वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या देयकाचे दोन कोटी रुपये थकविल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांचे रजा रोखीकरण, वैद्यकीय प्रतिकृती अनुदाने, ऑफलाइन वेतन, सातव्या वेतन आयोगाचा फरक देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१),(२) व (३) हे खरे नाही. बुलढाणा जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावरील सेवानिवृत्त झालेले कर्मचारी यांचे रजा रोखीकरण, वैद्यकीय प्रतिपूर्ती अनुदानित, ऑफलाइन वेतन, सातव्या वेतन आयोगाचा फरक असे एकूण अनुदान रु.१,९८,१३,०२६/- तालुका स्तरावर गट विकास अधिकारी पंचायत समिती व वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांचे स्तरावर पाठवण्यात आले आहे. जसे अनुदान प्राप्त होते त्यानुसार सेवानिवृत्त झालेले कर्मचारी यांचे लाभ अदा करण्यात येतात.

---

## गजवडी ते गोळेगाव स्मशानभूमी (ता.जि.सातारा) या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरु करण्याबाबत

**(३४) ५९४२४ (२५-०४-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गजवडी ते गोळेगाव स्मशानभूमी (ता.जि.सातारा) या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामास माहे जानेवारी, २०२२ च्या दुस-या आठवडयात प्रशासकीय मंजुरी मिळूनही रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामास अद्याप सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करुन तातडीने रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदरचे काम सन २०२२-२३ जिल्हा वार्षिक योजना जनसुविधा या योजनेअंतर्गत मंजूर आहे. सदर रस्ता अवर्गिकृत असून मंजूर रस्त्याची लांबी ११४ मीटर आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांच्या दि. ०१.१२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये रु. ५.०० लक्ष किमतीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यानंतर ग्रामपंचायत गजवडी यांचेकडून रस्त्यासाठी आवश्यक असणारी जमिनीची कागदपत्रे दि. २४/०३/२०२३ रोजी प्राप्त झाली. तद्नंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करून दि. २४/०४/२०२३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. सदरचे काम दि.०१/०८/२०२३ पूर्वी पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्धवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील दिव्यांग कल्याणासाठीचा निधी अखर्चित असल्याबाबत

**(३५) ६०४९३ (२५-०४-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासासाठी जिल्हा परिषदेच्या स्वसंपादित उत्पन्नातून ५ टक्के निधी दिव्यांग कल्याणासाठी राखीव ठेवला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२२-२३ या चालू आर्थिक वर्षात लातूर जिल्ह्यातील दिव्यांग कल्याणासाठीचा राखीव निधी माहे डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत अखर्चित राहिला असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिव्यांगांच्या वैयक्तिक व सामूहिक योजना निधीअभावी प्रलंबित असल्याने दिव्यांगांच्या विविध योजनांचा लाभ घेता आला नाही त्यामुळे विकासाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार दिव्यांगाच्या सर्वांगीण विकासाकरिता राखीव निधी विहित कालावधीत खर्च करण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही,

लाभार्थ्यांचे अर्ज डिसेंबर २०२२ पर्यंत लातूर जिल्ह्यातील पंचायत समित्यांकडे दाखल करुन घेण्याचे काम सुरु होते. अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जाची छाननी करुन लाभार्थ्यांची निवड करण्यात आली व त्यानंतर निधी वितरण करण्यात आले. त्यामुळे सदरचा निधी अखर्चित राहिलेला नाही.

(३) हे खरे नाही,

दिव्यांगासाठी वैयक्तिक व सामुहिक योजना राबविण्यात आल्या आहेत. त्यासाठीचा निधी वितरीत करण्यात आलेला असून त्याचा लाभ दिव्यांगाना देण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना घरकुलचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(३६) ६०९९८ (०३-०५-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण जनतेस २० ते २५ वर्षापूर्वी टिन पत्रे असलेले घरकुल व घर दुरूस्ती योजनेतंर्गत लाभ देण्यात येत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरकुल लाभार्थ्यांनी २० ते २५ वर्षा अगोदर घरकुलचा लाभ घेतला आहे परंतु आज ती घरे राहण्यायोग्य नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामपंचायतच्या "ड" प्रतिक्षा यादीत त्या लाभार्थ्याचे नाव असून सुध्दा त्याला पुर्वी लाभ मिळाला या सबबी खाली त्याला घरकुलचा लाभ देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील २० ते २५ वर्ष अगोदर लाभ घेतलेल्या परंतु आताचे प्रतिक्षा "ड" यादीत नाव असलेल्या लाभार्थ्यांना घरकुलचा लाभ देण्याबाबत शासन निर्णय घेणार काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०४-०८-२०२३) :** (१),(२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) इंदिरा आवास योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या, परंतु, घर राहण्यायोग्य नसलेल्या व आवास प्लस / प्रतिक्षा "ड" यादीत नाव समाविष्ट असलेल्या लाभार्थ्यांच्या संदर्भात प्रस्ताव केंद्र शासनाकडे दि. १४ जानेवारी, २०२२ च्या पत्रान्वये सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोंभूर्णा (जि.चंद्रपूर) तालुक्यात शासनाच्या विकासात्मक निधींचा गैरवापर होत असल्याबाबत**

**(३७) ६११९४ (०२-०५-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोंभूर्णा (जि.चंद्रपूर) तालुक्यात शासकीय निधीचा गैरवापर होत असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जो शासकीय निधी जनसुविधेसाठी खर्च करावयाचा असतो त्या योजनेतून घेण्यात आलेल्या वस्तूंवर जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य हे शासकीय निधी हा आपलाच निधी समजून आपल्या नावाचा शिक्का मारुन प्रसिध्दी मिळवित असल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली हे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार विकास निधी व १५ व्या वित्त आयोग निधीचा गैरवापर होत असल्याप्रकरणी संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून पुरवठादारांनी वस्तु / साहित्यांवर पंचायत समिती पदाधिकारी यांची नावे नोंदवून ग्रामपंचायतीला वितरीत केल्यामुळे पुरवठादार यांना दि. १६.१.२०२३ च्या पत्रान्वये खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. खुलासा प्राप्त न झाल्यामुळे २ वर्षासाठी संबंधित पुरवठा धारक यांना पंचायत समिती येथिल दरपत्रके व ई-निविदा सहभाग यावर बंदी घालण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**रावारी-बोपरे,(ता.लांजा, जि.रत्नागिरी) या गावात ग्रामसेवकांने नळपाणी पुरवठा योजनेच काम न करता संबंधितांना देयके अदा केली असल्याबाबत**

**(३८) ६१२११ (०३-०५-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावारी-बोपरे (ता.लांजा,जि.रत्नगिरी) येथे सन २०१६-१७ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर सुवर्ण जयंती दलितवस्ती योजनेअंतर्गत शासनाने मंजूर केलेल्या सुधारीत नळपाणी पुरवठा योजनेचे काम न करताच ग्रामसेवकाने संबंधितांना देयके अदा केल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांनी सुधारित नळपाणी पुरवठा व इतर कामाची चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरीकांनी माहे जानेवारी,२०२३ रोजी वा त्यादरम्यान तसेच दिनांक २६ जानेवारी,२०२३ रोजी उपोषण करणार असल्याचे गटविकास अधिकारी लांजा यांना निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३),(४) व (५) उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग, लांजा यांच्या दि. २२.९.२०२२ रोजीच्या गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लांजा यांना दिलेल्या अहवालानुसार नळपाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण झालेले आहे.

---

**चंद्रपूर जिल्हयातील ग्रामपंचायतींना तांत्रिक अडचणीमुळे वित आयोगाचा निधी खर्च करण्यात येत नसल्याबाबत**

**(३९) ६१८१० (०२-०५-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गावाच्या सर्वांगीन विकासासाठी स्वायत्त संस्था म्हणून ग्रामपंचायत अस्तित्वात आल्या केंद्र शासनांतर्गत सदर विकासकामासाठी चंद्रपूर जिल्हयात सन २०२२-२०२३ मध्ये वित्त आयोगाचा निधी दोन महिने आधीच बँक खात्यात जमा करण्यात आला परंतू तांत्रिक अडचणीमूळे दोन महिने उलटून सुध्दा सदर निधी चंद्रपूर जिल्हयातील ग्रामपंचायतींना खर्च करण्यात येत नसल्याची बाब माहे १ फेबुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अखर्चित निधीमूळे विकासाची कामे पुर्णत: प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदर निधी विकासकामावर खर्च करण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे

चौदावा वित्त आयोग, पंधरावा वित्त आयोग, सि.एस.आर. फंड व दलित वस्ती सुधार योजनेतून व अन्य ग्राम पंचायत अंतर्गत असलेली निधीतून लावण्यांत आलेली १२२ जलशुध्दीकरण सयंत्र ग्राम पंचायतीच्या देखभाल व दुरुस्ती अभावी बंद आहेत.तसेच जलस्वराज्य-II व निती आयोगाअंतर्गत लावण्यांत आलेले ३८ DFU व शासन स्तरावरुन मान्यता दिलेले १०७ R.O. चे देखभाल व दुरुस्ती १० वर्षाकरीता करारनामा शासनस्तरावरुन झालेला असल्याने ही सयंत्र सुरळीत सुरु आहे.

(३) सदर १५ वा वित्त आयोगातर्गत निधी सर्व ग्राम पंचायतींना वर्ग करण्यात आलेला आहे. ग्रामपंचायतींच्या आराखड्यानुसार ग्रामपंचायतींची कामे सुरु आहेत. परंतु सदर कामाचे देयक अदा करणेकरिता ग्रामपंचायतीच्या Login वर Reverse Receipt Entry उपलब्ध न झाल्यामुळे सदर निधी खर्च करणे करीता तांत्रीक अडचण सोडविण्यासंबंधाने चंद्रपूर जिल्हा परिषद कार्यालयाकडून शासनास पत्रव्यवहार करण्यात येऊन अडचण सोडविण्यात आलेली असून कामे सुरळीतपणे सुरु आहेत व सद्यस्थितीत तांत्रीक अडचणी संबंधाने चंद्रपूर जिल्हा परिषद कार्यालयास कुठलीही तक्रार प्राप्त झाली नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**खरिवली तर्फे कोहेज (ता.वाडा, जि.पालघर) या ग्रामपंचायतीच्या मालकीच्या व स्मशानभूमीसाठी राखून ठेवलेल्या जागेत अतिक्रमण करुन उत्खनन केल्याबाबत**

**(४०) ६१८५२ (०२-०५-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरिवली तर्फे कोहेज (ता.वाडा, जि.पालघर) या ग्रामपंचायतीच्या मालकीच्या व स्मशानभूमीसाठी राखून ठेवलेल्या एक एकर जागेत तेथील दगडखाण उद्योजकांनी बेकायदेशीर अतिक्रमण करुन उत्खनन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागेचा सातबारा हा ग्रामपंचायतीच्या नावे असून सदर ठिकाणाचे भूमापन करण्यासाठी ग्रामस्थांनी उपअधीक्षक, भूमापन अधिकारी, वाडा यांच्याकडे पैसे भरुनही अद्याप जमिनीची मोजणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त स्मशानभूमीच्या जागेत बेकायदा उत्खनन करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

ग्रामपंचायत खरिवली ता. वाडा येथील ग्रामपंचायतीच्या मालकीच्या व स्मशानभूमीसाठी राखून ठेवलेल्या गट क्र. ३७ (०-४०-०) जागेची भूमी अभिलेख कार्यालय वाडा जि. पालघर यांचेकडील दिनांक ०१.०२.२०२३ रोजी मोजणी करण्यात आलेली असून ग्रामपंचायत कार्यालय खरिवली तर्फे कोहोज यांचा अहवाल व उप अधिक्षक भूमापन अधिकारी वाडा यांचे कार्यालयाकडून हद्द निश्चिती अहवाल प्राप्त झालेला असून सदर जागेत अतिक्रमण झाल्याचे आढळून येत नाही.

(२) हे खरे नाही.

भूमी अभिलेख कार्यालयामार्फत दि.०१.०२.२०२३ रोजी मोजणी केली.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलशुध्दीकरण केंद्र बंद असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याबाबत**

**(४१) ६२१०४ (०२-०५-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील नागरिकांना पिण्यासाठी शुध्द पाणी मिळावे यासाठी जिल्हा परिषद चंद्रपूर च्या विविध

योजनांच्या माध्यमातून ठिकठिकाणी जलशुध्दीकरण संयत्र बसविण्यात आले आहे यावर कोटयवधी रूपये खर्च करण्यात आले मात्र काही महिने सुरळीत सुरू असलेले हे जलशुध्दीकरण संयत्र बंद पडली असून काही देखभाल दुरुस्ती तर काही ठिकाणी बिले थकीत असल्याने बंद पडली असल्याची बाब माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौदावा वित्त आयोग, पंधरावा वित्त आयोग, जलस्वराज्य सीएसआर फंड, दलित वस्ती सुधार योजनासह अन्य योजनेतून जलशुध्दीकरण संयत्र कंत्राटदाराच्या माध्यामातून लावण्यात आल्याने ते सयंत्र बंद पडलेले असतांनाही याकडे कंत्राटदारासह जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने चंद्रपुर जिल्हयातील नागरिकांना पिण्यासाठी बसविण्यात आलेल्या सयंत्राची दुरुस्ती करुन नागरिकांना शुध्द पाणी देण्याबाबत तसेच संबंधीतांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

ग्राम पंचायत स्तरावरील १२२ सयंत्रे ग्रामपंचायतच्या देखभाल व दुरुस्ती अभावी बंद पडलेली आहेत.
(२) हे खरे नाही, चौदावा वित्त आयोग, पंधरावा वित्त आयोग, सि.एस. आर. फंड व दलित वस्ती सुधार योजनेतून व अन्य ग्राम पंचायत अंतर्गत असलेली निधीतून लावण्यांत आलेली १२२ जलशुध्दीकरण सयंत्र ग्राम पंचायतीच्या देखभाल व दुरुस्ती अभावी बंद आहेत. तसेच जलस्वराज्य-II व निती आयोगाअंतर्गत लावण्यांत आलेले ३८ DFU व शासन स्तरावरुन मान्यता दिलेले १०७ R.O. चे देखभाल व दुरुस्ती १० वर्षाकरीता करारनामा शासनस्तरावरुन झालेला असल्याने ही सयंत्र सुरळीत सुरु आहे.
(३) याबाबत चौकशी करण्यांत आली असून विभागाच्या मासिक आढाव्यामधून १२२ जलशुध्दीकरण सयंत्रे ग्राम पंचायतच्या देखभाल व दुरुस्ती अभावी बंद पडल्याचे निदर्शनास आले असून ग्रामपंचायतींनी त्यांचे स्वउत्पन्नामधून निधी खर्च करून सयंत्रे पुनश्च कार्यान्वीत करण्याबाबत ग्रामपंचायतीना सुचना देण्यांत आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांच्या अयोग्य वर्तनाबद्दल व गैरकारभाराबाबत

**(४२) ६२२०० (०३-०५-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांच्या अयोग्य वर्तनाबद्दल व गैरकारभाराबाबत विभागीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी जिल्ह्यातील ग्रामसेवक संघटना तसेच ग्राम संवाद सरपंच संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, वनमंत्री तथा पालकमंत्री, चंद्रपूर जिल्हा यांच्याकडे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदरहू चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या प्रकरणी चौकशी करण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची द्विसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली असून चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव ग्रामपंचायत (ता.मुल, जि.चंद्रपूर) येथे जिल्हा वार्षिक योजना २०१९-२० अंतर्गत जनसुविधेच्या मंजूर कामात अपहार झाल्याबाबत**

**(४३) ६२२०२ (०२-०५-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव ग्रामपंचायत (ता.मुल, जि.चंद्रपूर) येथे जिल्हा वार्षिक योजना २०१९-२० अंतर्गत जनसुविधेतून पंचायत भवन बांधकामासाठी २० लक्ष रुपये तसेच स्मशानभूमी सौंदर्यीकरणासाठी १० लक्ष रुपये आहरण व संनियंत्रण अधिकारी या नात्याने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुल यांचेकडे दिनांक १७/०६/२०१९ रोजी वा त्यासुमाराच्या आदेशान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी वितरीत केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीतून करण्यात येणाऱ्या विकास कामांसाठी टप्प्याटप्पयाने विकासकामाची वस्तूस्थितीची पाहणी करुन, निधीच्या खर्चाचे मुल्यांकन, ई-टेंडरचे कागदपत्रे, कार्यारंभ आदेश व करारनामा इत्याचीची खातरमजा करुन पुढील टप्प्याचा निधी संबंधित ग्रामपंचायतीला वर्ग करणे आवश्यक असतांनाही संबधित अधिकाऱ्यांनी त्याची कोणतीही खातरजमा न करता उर्वरीत सर्व निधी ग्रामपंचायतीला वर्ग करुन शासकीय निधीचा अपहार केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी दोषी असलेल्या सर्व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे. सदर निधी सन २०१९-२० चा नसून सन २०१८-१९ चा आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

पंचायत समिती, मुल यांनी सदर निधींचा पहिल्या टप्प्यात (४०%) वितरीत केल्यानंतर ग्रामपंचायत नांदगाव, ता. मुल, जि. चंद्रपूर यांच्या मागणी पत्रानुसार ग्रामपंचायत प्रशासकीय मंजुरी व टेंडर बाबत घेतलेला ठराव तसेच ई-टेंडर कागदपत्राची खातरजमा करूनच दुस-या टप्प्यात (६०%) निधी संबंधीत ग्रामपंचायतीला वर्ग केला आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशीअंती रु. २२,१२,६७४/- निधीचा अपहार झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित सचिव, ग्रामपंचायत यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचेवर विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच सदर रक्कमेच्या वसुली बाबत संबंधित सरपंच व सचिव यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरण मा. न्यायालय, मूल येथे सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वच्छ भारत मिशन ग्रामीण योजनेतील एकात्मिक व्यवस्थापन माहिती यंत्रणेअंतर्गत मिळालेल्या निधीच्या वापरात महाराष्ट्र मागे असल्याबाबत**

**(४४) ६२२५३ (०३-०५-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वच्छ भारत मिशन -ग्रामीण (एस.बी.एम.जी) योजनेतील एकात्मिक व्यवस्थापन माहिती यंत्रणे अंतर्गत (आय.एम.आय.एस.) मिळालेल्या निधीच्या वापरात महाराष्ट्र मागे असल्याची गंभीर बाब माहे जानेवारी-फेब्रुवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलशक्ती मंत्रालयाने जारी केलेल्या माहिती नुसार मागील ८ वर्षात केंद्र सरकारने १० हजार ५३६ कोटी रुपये राज्याला उपलब्ध करुन दिले त्यातील केवळ ४५९४ कोटी रुपयेच खर्च करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सन २०१४ पासून जलशक्ती मंत्रालयाने वैयक्तीक घरगुती स्वच्छाता गृह ,सार्वजनिक स्वच्छता गृहे, सार्वजनिक सेंद्रिय खत खड्डे, सार्वजनिक बायोगॅस आणि इतर योजनांसाठी केंद्र सरकारने दिलेला संपूर्ण निधी ग्रामीण भागात खर्च न केल्याने अनेक योजना प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत,
५) असल्यास, केन्द्रीय जलशक्ती मंत्रालयाने मागील ८ वर्षात दिलेल्या १० हजार ५३६ कोटी रु.निधीतील शिल्क निधी रु.५ हजार ९४२ कोटी खर्च करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने ग्रामीण भागात स्वच्छ भारत मिशन योजना प्रभाविपणे राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१८-०८-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-१ व टप्पा-२ च्या अंमलबजावणीकरिता सन २०१४-१५ ते सन २०२२-२३ या कालावधीमध्ये राज्यास केंद्र शासनाकडून रु.३९५६.३३ कोटी व राज्यशासनाद्वारे रु.२९६६.६३ कोटी अशी एकूण रु.६९२२.९६ कोटी रक्कम उपलब्ध झालेली होती. त्यापैकी दि. १३.०७.२०२३ पर्यंत रु. ६४७४.९९ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-१ कार्यक्रम सन २०१४-२०१९ या कालावधीत राबविण्यात आला होता. स्वच्छ भारत मिशन टप्पा-१ मध्ये वैयक्तिक घरगुती स्वच्छता गृह, सार्वजनिक स्वच्छता गृह या घटकांची अंमलबजावणी करून सर्व राज्य सन २०१८-१९ मध्ये हागणदारी मुक्त करण्यात आले आहे. केंद्र शासनाने सन २०२० मध्ये स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ ची घोषणा केली असून या टप्प्यामध्ये वैयक्तिक घरगुती स्वच्छता गृह, सार्वजनिक स्वच्छता गृह याबरोबरच सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची कामे समाविष्ट आहेत. घनकचरा व्यवस्थापनांतर्गत सार्वजनिक सेंद्रिय खत खड्डे, सार्वजनिक बायोगॅस इ. कामे क्षेत्रीय स्तरावर सुरु आहेत. सन २०२५ पर्यंत सदर कामे पूर्ण करुन गावे "हागणदारीमुक्त अधिक" (ODF+) करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) मुद्दा क्र. २ मध्ये तपशीलानुसार खर्च करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ मधील वैयक्तिक घरगुती स्वच्छता गृह, सार्वजनिक स्वच्छता गृह, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन (PWM), गोबरधन, मैला गाळ व्यवस्थापन या सर्व घटकांच्या अंमलबजावणीची कार्यवाही जिल्हास्तरावरुन करण्यात येत आहे.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यासाठी खास बाब म्हणून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत तीन वर्षाचे नियोजन एकत्र करणेबाबत

**(४५) ६२६१९ (०२-०५-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक गाव जोडण्याच्या हेतूने ही योजना काम करीत असूनही गडचिरोली जिल्ह्यातील असंख्य गावे त्यापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अनेक गावातील रस्त्यांचे डांबरीकरण व मजबुतीकरण मागील तीन वर्षांपासून झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आता २ वर्षाच्या शिल्लक कालावधीमध्ये ३ वर्षाचे नियोजन एकत्र केल्यास १००% टक्के गावे डांबरीकरणाचे लक्ष निर्धारित करून त्याचा जिल्ह्याला अधिक लाभ होईल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुसार उक्त ३ वर्षाचे नियोजन एकत्र करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१),(२),(३) व (४) ग्रामीण भागातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना राबविण्यात येत आहे. यास्तव सदर योजनतर्गत रस्ते दर्जोन्नतीसाठी १०,००० कि.मी. इतक्या लांबीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.दर्जोन्नतीसाठी रस्ते विकास आराखड्यानुसार राज्यातील अस्तित्वात असलेल्या इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग रस्त्यांची एकुण लांबी व त्या जिल्ह्यातील/तालुक्यातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांची लांबीच्या प्रमाणात ज्या ग्रामीण रस्त्यांवर जास्त वर्दळ आहे, अशा रस्त्यांचा प्राधान्याने विचार करण्यात येतो.तसेच गडचिरोली जिल्ह्यातील रस्त्यांच्या बाबतीत प्रचलित धोरण,उपलब्ध निधी व प्राथम्यक्रमानुसार रस्त्यांची निवड करून कामे सुरू करण्याचे नियोजन आहे.
(५) निरंक.

---

**राज्यात स्टार्ट-अप हब सुरू करण्याबाबत**

**(४६) ६३१७१ (२७-०४-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अधिकाधिक रोजगार निर्मिती करण्याकरीता केंद्र शासनाच्या स्टार्ट-अप्स तंत्र संशोधनाच्या धर्तीवर तरुणांना करीअरच्या संधी निर्माण करण्याकरीता राज्य शासन इको सिस्टीम वाढीकरीता कोणते धोरण राबवित आहे अथवा राबविण्यात येत आहे,
(२) असल्यास, मुंबई ही राज्याची आर्थिक राजधानी असताना या राज्यात स्टार्ट-अप सारखे आधुनिक तंत्रज्ञान निर्माण करून व त्यात गुंतवणूकदारांना पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी अधिकाधिक संधी देऊन आकर्षित करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(३) असल्यास, राज्यात व विशेषत: मुंबई शहरात स्टार्ट-अप हब निर्माण करण्याची आवश्यकता असताना तसे झाले नसल्याने येथील बेरोजगार तरुणांना नोकऱ्यांची संधी उपलब्ध होत नसल्याची बाब निर्माण झाली असल्याप्रकरणी शासनाचे धोरण काय आहे,
(४) असल्यास, राज्यात स्टार्ट-अप हब करण्यात आले नसल्याने येथील तरुण बंगरुळसारख्या अन्य राज्यातील शहरांत जाऊन नोकऱ्यांसाठी प्रयत्न करीत असल्याची बाब निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२७-०७-२०२३) :** (१) कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्ट अप धोरण २०१८" राबविण्यात येत आहे. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी स्थापन करून त्याद्वारे स्टार्टअप व नाविन्यता क्षेत्राशी संबधित विविध योजना व उपक्रम राबविले जातात.
(२) नवउद्योजकांच्या संकल्पनांना, प्रारंभिक टप्यातील स्टार्टअप ला विकसित करण्यासाठी आवश्यक सल्ला आणि तांत्रिक मार्गदर्शन इन्क्युबेटर्स मार्फत केले जाते.

तसेच प्रारंभिक टप्प्यामधील स्टार्टअप्सना त्यांच्या भौगोलिकतेवर अवलंबून न राहता, व्हर्च्युअल माध्यमातून आवश्यक सल्ला आणि तांत्रिक मार्गदर्शन पुरविण्यात येते. एकूण १८ इन्क्युबेटर सेंटर ला मान्यता देण्यात आली असून मुंबईमध्ये ०२ इन्क्युबेटर सेंटर कार्यरत आहेत.

राज्यातील प्रारंभिक टप्प्यातील स्टार्टअप्सना भांडवल (seed fund) उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्टार्टअप फंड सारखे उपक्रम हाती घेण्यात येत आहे.

(३) नवी मुंबईतील कळंबोली जि. रायगड येथे स्टार्टअपसाठी येथे निवासी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था उभारण्याची घोषणा केली आहे. सदर संस्था स्थापन करण्याची कार्यवाही उद्योग विभागाकडून सुरू आहे.

तसेच कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाकडून राज्यातील बेरोजगार तरूणांच्या समस्या सोडविण्यासाठी रोजगार मेळावे, मॉडेल करीयर सेंटर, रोजगार प्रोत्साहन उपक्रम तसेच ऑनलाईन समुपदेशन इ. योजना राबविण्यात येतात.

(४) हे खरे नाही.

याबाबतची कोणतीही बाब या विभागाच्या निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरुड व मोर्शी (जि.अमरावती) पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिकस्त वर्ग खोल्यांचे बांधकामाची दुरुस्तीबाबत

**(४७) ६३२९७ (०२-०५-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड व मोर्शी (जि.अमरावती) अंतर्गत पंचायत समिती मध्ये मोठ्या संख्येने ५० वर्षा पेक्षा जास्त कालावधीच्या शाळेच्या शिकस्त वर्ग खोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना बसविण्यात येत असल्याची बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शाळेतील मुख्याध्यापकांनी शिकस्त वर्ग खोल्यांचे बांधकाम पाडण्यासाठी वरीष्ठ कार्यालयास कळण्यात आले असूनही त्यावर अद्यापही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर ठिकाणी दुर्घटना घडल्यास शासन जबाबदारी घेणार काय अथवा शिकस्त वर्गखोल्यांचे दुरुस्तीचे बांधकाम त्वरीत करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) उपरोक्त प्रकरणी पंचायत समिती मोर्शी अंतर्गत ४ शाळेतील ७ वर्गखोल्या व पंचायत समिती वरुड अंतर्गत ५ शाळेतील ५ वर्ग खोल्यांचे नव्याने बांधकाम करण्याकरीता सन २०२२-२३ च्या नियोजनामध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मंजूरी देण्यात आली आहे. मंजुर कामांच्या निविदा प्रक्रियेची कार्यवाही जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडुन अंतिम टप्प्यात आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दुष्टीने संपुर्ण जिल्हयातील विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था सुस्थितीत असलेल्या वर्गखोल्यामंध्ये करण्याकरीता सर्व गटशिक्षणाधिकारी यांना मासिक सभेमध्ये सुचना देण्यात आलेल्या असुन लेखी पत्राव्दारे सुध्दा कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दोडामार्ग तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) पाळये गावाला जोडणाऱ्या पुलाकडच्या रस्त्याच्या पुलांची पुनर्बांधणी करण्यास होत असलेला विलंबाबाबत

**(४८) ६३६१३ (०३-०५-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाळये (ता.दोडामार्ग,जि.सिंधुदुर्ग) गावाला जोडणाऱ्या (वाघेरी-वायंगणीकडील) पुलाकडच्या रस्त्याचा भराव दोन वर्षापूर्वी (२०१९-२१) झालेल्या अतिवृष्टीमुळे वाहून गेल्याने काही महिने वाहतूक पुर्णपणे बंद असल्यामुळे ग्रामस्थांनी पुलाचा जोडरस्ता मातीचा भराव घालून तयार केला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम पुरनिधीतून करण्यात येईल असे संबंधित अधिकारी यांनी कळवून दोन वर्षांचा कालावधी होऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामस्थांनी दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन पाठवून पुलाच्या ठिकाणी दि.१४.२.२०२३ पासून उपोषणाला बसण्याचा इशारा जिल्हा परिषद बांधकाम विभाग व अन्य संबंधीतांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले त्यानुषंगाने उक्त पुलाच्या पुनर्बांधणीचे काम विनाविलंब पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

सदरचा पूल सुमारे २५ वर्षापुर्वी बांधलेला असून सद्यस्थितीत पुलावरुन वाहतूक सुरु आहे. जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये पुलाच्या एका बाजूच्या जोड रस्त्याच्या भरावाचा काही भाग वाहून गेला होता. त्यामुळे ४ ते ५ दिवस संपर्क तुटला होता असे जिल्हा परिषदेने कळविले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) सदर पुलाच्या जोड रस्त्याचा काही भाग वाहून गेल्यानंतर ४ ते ५ दिवसात तात्पुरत्या स्वरुपात सुस्थितीत करण्यात आलेला आहे. सदर पूलाच्या जोडरस्त्याचे संरक्षण भिंत बांधण्याचे रु.७.७१ लक्षचे काम जिल्हा परिषद निधी व रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंजूर आहे. सदर दोन्ही काम प्रगतीत असून पूलाच्या बाजूला १२०० मिमी व्यासाचे पाईपची एक रांग बसवून पूलाच्या तिलारी बाजूकडील पूलाच्या दोन्ही बाजूला संरक्षण भिंत बांधून रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत करण्यात आलेला आहे.

तसेच सदर पूलाचे नव्याने बांधकाम करण्यासाठी सन २०२३ च्या अर्थसंकल्पामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रु.१.०० कोटीचे काम मंजूर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंगळवेढा तालुका (जि.सोलापूर) येथे प्रधानमंत्री व रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४९) ६३६६५ (०३-०५-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा तालुका (जि.सोलापूर) येथे प्रधानमंत्री व रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना स्वत:ची जागा नसल्यामुळे अनेक घरकुल लाभार्थ्यांचा निधी परत गेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जागा नसलेल्या लाभार्थ्यांना अगोदर जागा उपलब्ध करून द्यावी जेणेकरून त्यांना भविष्यात बेघर राहता येणार नाही व त्यांचा निधी केंद्र शासनाकडे परत जाणार नाही याकरीता नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे विनंती केली आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने प्रधानमंत्री व रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०४-०८-२०२३) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजनेंतर्गत प्राप्त उद्दीष्टानुसार घरकुले देण्यात आली असून भूमिहिन लाभार्थ्यांना घरकुलांसाठी शासकीय जमीनही विनामूल्य प्रदान केली आहे.

ऊर्वरित पात्र लाभार्थ्यांना घरकुले देण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर प्रगतीत आहे. निधी परत गेलेला नाही.

---

**ग्रामविकासासाठी ग्रामपंचायतींकडून आराखडा करुन सादर केलेल्या कामांना तांत्रिक मंजुरीच मिळत नसल्याबाबत**

**(५०) ६३८१८ (०३-०५-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामविकासासाठी ग्रामपंचायतींकडून आराखडा करुन सादर केलेल्या कामांना सहा महिने ते एक वर्षापर्यंत तांत्रिक मंजूरीच मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आराखडयाला मंजूरी देण्यासाठी तालुकास्तरावर गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, उपविभागीय जलसंधारण अधिकारी, उपअभियंता असे एकूण १० जणांची समिती असून त्यांच्यामध्ये समन्वय नसल्यामुळे व काहीवेळा विशिष्ट हेतूने जाणीवपूर्वक अडवणूक केली जात असल्याने निधी उपलब्ध असूनसुध्दा विकासकामांना विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०७-२०२३) :** (१) नाही.

(२) अशा प्रकारचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.